भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

सत्यमेव जयते

# सेना आणि वायुसेना (खाजगी संपत्तीची विल्हेवाट) अधिनियम, १९५०

**(सन १९५० चा अधिनियम क्रमांक ४०)**

[२६ फेब्रुवारी, २००४ रोजी यथाविद्यमान]

# The Army and Air Force (Disposal of Private Property) Act, 1950

**(Act No. 40 of 1950)**

[ *As in force on the 26th February, 2004* ]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, मुंबई ४०० ००४
यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

२००७

[किंमत : रुपये १०.००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २६ फेब्रुवारी, २००४ रोजी यथाविद्यमान असलेला दि आर्मी ॲन्ड एअर फोर्स (डिसपोजल ऑफ प्रायव्हेट प्रॉपर्टी) ॲक्ट, १९५० याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे **राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १३, अंक २, दिनांक १४ ऑक्टोबर, २००४ यात पृष्ठे ८२ ते ८७ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्रधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक १४ ऑक्टोबर २००४.

**टी. के. विश्वनाथन,**
सचिव, भारत सरकार.

# PREFACE

This edition of the The Army and Air Force (Disposal of Private Property) Act, 1950 as on the 26th February, 2004 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette* of India, Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 13, dated 14th October, 2004 on pages 82 to 87.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Date 14th October 2004.

T. K. VISWANATHAN,
Secretary to the Government of India.

एच ४१०४—१

# सेना आणि वायुसेना (खाजगी संपत्तीची विल्हेवाट) अधिनियम, १९५०

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार आणि प्रारंभ.

२. व्याख्या.

३. अधिकाऱ्यांच्या खेरीज मयत व्यक्तींची आणि सेवेतून पळून गेलेल्या व्यक्तींची संपत्ती.

४. मृत किंवा सेवेतून पळून गेलेल्या अधिकाऱ्यांची संपत्ती.

५. रेजिमेंटची व शिबिर किंवा क्वार्टर्समधील इतर ऋणे याबाबतच्या प्रश्नांचा निर्णय.

६. समादेशक अधिकाऱ्यांच्या किंवा समितीच्या प्रतिनिधित्वाचे अधिकार.

७. महाप्रशासकाकडे मयत व्यक्तींची संपदा देण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.

८. विहित व्यक्तींनी अधिक रकमेची विल्हेवाट लावणे.

९. चीजवस्तूंची विल्हेवाट लावणे, परंतु पैशाची नाही.

१०. मृत्युपत्रप्रमाण इत्यादी सादर न करता विवक्षित संपत्तीची विल्हेवाट लावणे.

११. समादेशक अधिकारी, समिती किंवा विहित व्यक्ती व केंद्र सरकार यांची कार्यमुक्ती.

१२. समादेशक अधिकारी, समिती किंवा विहित व्यक्ती जेथे स्थित आहे तेथे समादेशक अधिकारी, समिती किंवा विहित व्यक्ती यांच्या अखत्यारीत असलेली संपत्ती.

१३. प्रतिनिधींच्या हक्कांची व्यावृत्ती.

१४. विकलमनाच्या व्यक्तीला किंवा सक्रीय सेवेत असताना बेपत्ता व्यक्ती म्हणून कळवण्यात आलेल्या व्यक्तींना कलमे ३ ते १३ लागू असणे.

१५. विवक्षित प्रकरणांत समायोजन स्थायी समिती नियुक्त करणे.

१६. नियम करण्याचा अधिकार.

१७. *   *   *

# सेना आणि वायुसेना (खाजगी संपत्तीची विल्हेवाट) अधिनियम, १९५०

**(१९५० चा अधिनियम क्रमांक ४०)**

(२६ फेब्रुवारी, २००४ रोजी यथाविद्यमान)

[२८ एप्रिल, १९५०]

**सेना अधिनियम, १९५० (१९५० चा ४६) किंवा वायुसेना अधिनियम, १९५० (१९५० चा ४५) याच्या अधीनतेने, मृत झालेल्या किंवा सेवेतून पळून गेलेल्या किंवा विकल मनाचा झाल्याबाबत खात्री झालेल्या किंवा सेवेत कार्यरत असताना हरवलेला असल्याचे अधिकृतपणे कळवण्यात आलेल्या व्यक्तींच्या खाजगी संपत्तीची विल्हेवाट लावण्यासाठी अधिनियम.**

हा अधिनियम संसदेद्वारा पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**संक्षिप्त नाव, विस्तार आणि प्रारंभ.**

**१.** (१) या अधिनियमास, सेना आणि वायुसेना (खाजगी संपत्तीची विल्हेवाट) अधिनियम, १९५० असे म्हणावे.

(२) याचा विस्तार संपूर्ण भारतभर असेल आणि भारताचे नागरिक आणि सेना अधिनियम, १९५० (१९५० चा ४६) किंवा वायुसेना अधिनियम, १९५० (१९५० चा ४५) याच्या अधीन असणाऱ्या व्यक्ती यांना, त्या कुठेही असल्या तरी लागू असेल.

(३) हा अधिनियम, केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या संदर्भात नियत करील अशा दिनांकापासून अंमलात येईल.

**व्याख्या.**

**२.** या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(१) "समिती" याचा अर्थ, कलम ४ खाली घटित करण्यात आलेली समायोजन समिती, असा आहे ;

(२) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमाद्वारे विहित, असा आहे ;

(३) "रेजिमेंट आणि शिबिर किंवा क्वार्टर्स यांमधील इतर देणी" यामध्ये,—

(एक) सेना अधिनियम, १९५० (१९५० चा ४६) याच्या अधीन असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या संबंधात सैनिकी देणीबाबतच्या देय रकमा, उदाहरणार्थ पुढील बाबींच्या संबंधातील किंवा पुढील बाबींबाबतच्या अग्रिमाच्या संबंधातील देय रकमा,—

(क) क्वार्टर्स ;

(ख) भोजनालय, बँड व रेजिमेंटचे इतर हिशेब ;

(ग) सैनिकी पोषाख, नियुक्त्या व साधनसामग्री, मात्र जी, मयत व्यक्तीच्या तीन महिन्यांच्या वेतनाच्या एकूण रकमेपेक्षा अधिक नसेल आणि त्याच्या मृत्यूच्या दिनांकापूर्वीच्या अठरा महिन्यांच्या आत देय झालेली असेल ; आणि

(दोन) वायुसेना अधिनियम, १९५० (१९५० चा ४५) याच्या अधीन असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या संबंधात वायुसेना देणीबाबतच्या देय रकमा, उदाहरणार्थ, पुढील बाबींच्या संबंधातील किंवा पुढील बाबींबाबतच्या अग्रिमाच्या संबंधातील देय रकमा,—

(क) क्वार्टर्स ;

(ख) भोजनालय, बँड व इतर सेवा या संबंधातील हिशेब ;

(ग) वायुसेना पोषाख, नियुक्त्या व साधनसामग्री, मात्र जी, मयत व्यक्तीच्या तीन महिन्यांच्या वेतनाच्या एकूण रकमेपेक्षा अधिक नसेल आणि त्याच्या मृत्यूच्या दिनांकापूर्वीच्या अठरा महिन्यांच्या आत देय झालेली असेल,

यांचा समावेश आहे ;

(४) "प्रतिनिधित्व" यामध्ये, मृत्युपत्रप्रमाण, प्रबंधपत्र - मग त्याला मृत्युपत्र जोडलेले असो अथवा नसो - आणि अशा उत्तराधिकार प्रमाणपत्राचा अंतर्भाव होतो ज्याद्वारे एखाद्या व्यक्तीला, मृत्युपत्र व्यवस्थापक किंवा मयत व्यक्तीच्या संपदेचा प्रशासक नेमण्यात येते किंवा मयत व्यक्तीची मत्ता प्राप्त करण्यासाठी किंवा वसूल करण्यासाठी प्राधिकृत केले जाते ;

(५) "प्रतिनिधी" याचा अर्थ, जिने प्रतिनिधित्व घेतले आहे अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे, परंतु यात महाप्रशासकाचा अंतर्भाव नाही ;

(६) या अधिनियमामध्ये वापरलेल्या आणि सेना अधिनियम, १९५० (१९५० चा ४६) किंवा वायुसेना अधिनियम, १९५० (१९५० चा ४५) यामध्ये व्याख्या करण्यात आलेल्या आणि या अधिनियमात व्याख्या करण्यात न आलेल्या सर्व शब्दांना व वाक्प्रयोगांना अनुक्रमे त्या त्या अधिनियमामध्ये नेमून दिलेला अर्थ आहे असे मानण्यात येईल.

(शा.म.मु.) एच ४१०४—२ (१०३५—०५—०७)

**अधिकाऱ्यांच्या खेरीज मयत व्यक्तीची आणि सेवेतून पळून गेलेल्या व्यक्तीची संपत्ती.**

**३.** (१) सेना अधिनियम, १९५० (१९५० चा ४६) किंवा, यथास्थिति, वायुसेना अधिनियम, १९५० (१९५० चा ४५) याच्या अधीनतेने जो अधिकारी नाही अशा कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू झाल्यावर किंवा ती सेवेतून पळून गेल्यावर ती मृत किंवा सेवेतून पळून गेलेली व्यक्ती ज्या दलाची, विभागाची, तुकडीचीं किंवा युनिटची असेल, तिचा समादेशक अधिकारी, होईल तितक्या लवकर आणि, याबाबत करण्यात येतील अशा कोणत्याही नियमांच्या अधीनतेने,---

(क) मयत किंवा सेवेतून पळून गेलेल्या व्यक्तींची शिबिरात किंवा क्वार्टर्समध्ये असलेली सर्व जंगम संपत्ती मिळवील आणि त्याची एक वस्तूसूची तयार करवील,

(ख) अशा व्यक्तीला देय असलेले वेतन व भत्ते काढील,

(ग) अशा व्यक्तीची रेजिमेंटची आणि शिबिर किंवा क्वार्टर्सची काही देणी असल्यास त्यांच्या प्रदानासाठी योग्य ती तरतूद करील.

(२) मयत व्यक्तींच्या बाबत, समादेशक अधिकारी,---

कोणत्याही बँक व्यवसायी कंपनीमध्ये (यात कोणत्याही टपाल कार्यालयाची बचत बँक, सहकारी बँक किंवा सोसायटी किंवा पैशाच्या स्वरूपात ठेवी स्वीकारणारी इतर कोणतीही संस्था-मग अशा संस्थेचे नाव काहीही असो-यांचा अंतर्भाव आहे) मयत व्यक्तीने ठेवलेला सर्व पैसा,---

(क) या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांद्वारे अन्यथा तरतूद करण्यात न आलेल्या एखाद्या प्रकरणात त्यात जर असे दिसून आले की, रेजिमेंटची आणि शिबिराची किंवा क्वार्टर्सची अन्य देणी, मयत व्यक्तीच्या अंत्यसंस्काराचा खर्च आणि मयत व्यक्तीच्या संपदेबाबत समादेशक अधिकाऱ्याने जर काही खर्च केला असेल तर त्या खर्चाच्या प्रदानासाठी तरतूद करणे आवश्यक असल्यास गोळा करील, आणि

(ख) अन्य प्रकरणाबाबत गोळा करू शकेल,---

आणि अशा प्रयोजनासाठी, अशी बँक व्यवसायी कंपनी, सोसायटी किंवा अन्य संस्था यांच्या नियमावलीत काहीही अंतर्भूत असले तरी, त्या बँक व्यवसायी कंपनीचा, सोसायटीचा किंवा अन्य संस्थेचा अभिकर्ता, व्यवस्थापक किंवा अन्य कोणताही अधिकारी यांना ताबडतोब तो पैसा समादेशकाकडे प्रदान करण्यास फर्मावील आणि असा अभिकर्ता, व्यवस्थापक किंवा अन्य अधिकारी ती मागणी पूर्ण करण्यास बांधील राहील.

(३) जेव्हा पोट कलम (२) अन्वये करण्यात आलेल्या मागणीनुसार बँक व्यवसायी कंपनी, सोसायटी किंवा अन्य संस्था यांच्याकडून रकमेचे प्रदान करण्यात आलेले असेल तेव्हा, कोणत्याही व्यक्तीस, बँक व्यवसायी कंपनी, सोसायटी किंवा अन्य संस्था यांचेकडे अशा रकमेबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही.

(४) जेव्हा रेजिमेंटच्या आणि शिबिर किंवा क्वार्टर्स याबाबतची देणी, काही असल्यास, ती प्रदान करण्याबाबत आणि मयत व्यक्तीच्या अंत्यसंस्काराच्या खर्चाच्या प्रदानासाठी कोणतीही अन्यथा तरतूद करण्यात आलेली नसेल अशा प्रकरणी त्या प्रदानाबाबत आणि मयत व्यक्तीच्या संपदेबाबत समादेशक अधिकाऱ्याने केलेल्या अन्य काही खर्चाच्या प्रदानाबाबत अशा मयत व्यक्तीच्या प्रतिनिधीने, समादेशक अधिकाऱ्याने समाधान होईल अशी हमी दिलेली असेल तेव्हा, समादेशक अधिकारी, पोटकलम (१) व (२) अन्वये त्याने प्राप्त केलेली संपत्ती त्या प्रतिनिधीकडे सुपूर्द करील आणि त्यानंतर मयत व्यक्तीच्या संपदेच्या प्रशासनाबाबतचे त्याचे उत्तरदायित्व संपुष्टात येईल.

(५) ज्या मयत व्यक्तीच्या संपदेबाबत पोटकलम (४) किंवा कलम १० अन्वये कार्यवाही करण्यात आलेली नसेल अशा मयत व्यक्तीच्या बाबतीत आणि सेवेतून पळून गेलेल्या व्यक्तींच्या बाबतीत समादेशक अधिकारी,---

(एक) जर त्याच्या मते एखाद्या प्रकरणात मृत किंवा सेवेतून पळून गेलेल्या व्यक्तीच्या रेजिमेंटची व शिबिर किंवा क्वार्टर्स याबाबतची अन्य देणी प्रदान करण्याची, मयत व्यक्तीच्या अंत्यसंस्काराच्या खर्चाच्या प्रदानाची आणि मयत किंवा सेवेतून पळून गेलेल्या व्यक्तीच्या संपदेसंबंधात समादेशक अधिकाऱ्याने काही खर्च केला असल्यास, त्या कोणत्याही खर्चाच्या प्रदानाची हमी मिळण्याच्या प्रयोजनार्थ तसे करणे आवश्यक असेल तर तो त्या मृत किंवा यथास्थिति, सेवेतून पळून गेलेल्या व्यक्तीची, जंगम संपत्ती विकण्याची वा यथास्थिति, रोखीत परिवर्तित करण्याची व्यवस्था करील, आणि

(दोन) कोणत्याही अन्य प्रकरणात, व्यवस्था करू शकेल.

(६) समादेशक अधिकारी, पोटकलम (१), (२) व (५) अन्वये प्राप्त, गोळा किंवा वसूल केलेल्या रकमेपैकी यथास्थिति, मयत किंवा सेवेतून पळून गेलेल्या व्यक्तीच्या रेजिमेंटची आणि शिबिर किंवा क्वार्टर्समधील अन्य ऋणे, अन्य काही असल्यास, मयत किंवा सेवेतून पळून गेलेल्या व्यक्तीच्या संपदेबाबत समादेशक अधिकाऱ्याने काही खर्च केला असल्यास तो खर्च आणि मयत व्यक्तीच्या बाबतीत तिच्या अंत्यसंस्काराच्या खर्चासाठी अन्यथा कोणतीही तरतूद करण्यात आलेली नसेल अशा परिस्थितीत तिच्या अंत्यसंस्काराचा खर्च चुकता करील.

(७) पोटकलम (६) मध्ये विनिर्दिष्ट केलेली देणी व खर्च चुकता केल्यानंतर काही रक्कम शिल्लक राहिली असल्यास, ती शिल्लक रक्कम,---

(क) मयत व्यक्तीच्या बाबतीत तिचा प्रतिनिधी असल्यास त्याला किंवा मृत्यूनंतर बारा महिन्यांच्या कालावधीत अशा शिल्लक राहिलेल्या रकमेसाठी कोणीही कोणतीही हक्कमागणी केली नाही तर, विहित करण्यात आलेल्या व्यक्तीला देण्यात येईल ; आणि

(ख) सेवेतून पळून गेलेल्या व्यक्तीच्या बाबतीत, विहित करण्यात आलेल्या व्यक्तीला ताबडतोब प्रदान करण्यात येईल आणि सेवेतून पळून गेल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर, जर त्या कालावधीच्या दरम्यान सेवेतून पळून गेलेल्या व्यक्तीने स्वतःला समर्पित केले नसेल किंवा तिला पकडण्यात आले नसेल तर, केंद्र सरकारच्या खाती समपहृत करण्यात येईल :

परंतु, जर सेवेतून पळून गेलेल्या व्यक्तीने त्या कालावधीत स्वतःला समर्पित केले नसेल किंवा ती पकडली गेली नसेल तर विहित व्यक्ती, खंड (ख) खाली तिला प्राप्त झालेली संपूर्ण शिल्लक रक्कम किंवा अशा रकमेचा कोणताही भाग, उक्त तीन वर्षांच्या कालावधीत कोणत्याही वेळी सेवेतून पळून गेलेल्या व्यक्तीच्या पत्नीस किंवा मुलास किंवा तिच्यावर अवलंबून असलेल्या कोणत्याही अन्य व्यक्तीस अदा करू शकेल.

**स्पष्टीकरण.**---या कलमातील व कलम ४ मधील "अधिकारी" या शब्दामध्ये वायुसेना अधिनियम, १९५० (१९५० चा ४५) याच्या अधीन असलेल्या व्यक्तीच्या संदर्भात मृत किंवा सेवेतून पळून गेलेल्या वॉरंट अधिकाऱ्याचाही समावेश आहे.

**मृत किंवा सेवेतून पळून गेलेल्या अधिकाऱ्यांची संपत्ती.**

**४.** कलम ३ च्या तरतुदी, मृत किंवा सेवेतून पळून गेलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या संपत्तीची विल्हेवाट लावण्यासाठी देखील, सेना अधिनियम, १९५० (१९५० चा ४६) किंवा वायुसेना अधिनियम, १९५० (१९५० चा ४५) याला अधीन राहून लागू राहतील परंतु त्यात खालील फेरबदल केले जातील :---

(एक) कलम ३ खालील समादेशक अधिकाऱ्यांची कामे विहित पद्धतींनुसार त्याबाबतीत घटित करण्यात आलेल्या समायोजन समितीकडून पार पाडली जातील ;

(दोन) कलम ३, पोटकलम (६) मध्ये विनिर्दिष्ट केलेली देणी व खर्च यांचे प्रदान केल्यानंतर शिल्लक रक्कम काही असेल तर, मृत अधिकाऱ्याच्या बाबतीत, ती त्याच्या विहित व्यक्तीला अदा करण्यात येईल.

**रेजिमेंटची व शिबिर किंवा क्वार्टर्स बाबतची इतर देणी याबाबतच्या प्रश्नांचा निर्णय.**

**५.** जर एखाद्या प्रकरणी, मृत किंवा सेवेतून पळून गेलेल्या व्यक्तीची रेजिमेंटची आणि शिबिर किंवा क्वार्टर्स बाबतची देणी काय आहेत किंवा त्याची प्रदेय असलेली रक्कम किती आहे यासंबंधात कोणतीही शंका वा विवाद उद्‌भवला तर या संबंधात विहित व्यक्तीचा निर्णय अंतिम असेल आणि तो सर्व व्यक्तींना सर्व प्रयोजनांसाठी बंधनकारक असेल.

**समादेशक अधिकाऱ्याच्या किंवा समितीच्या प्रतिनिधित्वाचे अधिकार.**

**६.** कलम ३ किंवा कलम ४ खालील आपल्या कर्तव्यांचे पालन करण्याच्या प्रयोजनार्थ समादेशक अधिकाऱ्याला किंवा, यथास्थिति, समितीला जणू काही त्याने किंवा तिने मयत व्यक्तीच्या संपदेचे प्रतिनिधित्व घेतलेले आहे असे मानून, इतर सर्व व्यक्ती व प्राधिकारी---मग त्या कोणत्याही असोत किंवा काहीही असोत---अपवर्जित करून तसेच हक्क व अधिकार असतील, आणि समादेशक अधिकारी किंवा, यथास्थिति, समिती यांच्याकडून देण्यात आलेली कोणतीही पावती त्यानुसार परिणामक असेल.

**महाप्रशासकाकडे मयत व्यक्तीची संपदा देण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.**

**७.** (१) [१][महाप्रशासक अधिनियम, १९६३ (१९६३ चा ४५) यामध्ये काहीही अंतर्भूत केलेले असेल तरी महाप्रशासक, मयत व्यक्तीच्या ज्या संपत्तीबाबत कलम ३ किंवा कलम ४ च्या तरतुदींन्वये कार्यवाही करण्यात आलेली असेल त्या संपत्तीबाबत या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा त्याखाली त्याने तशी कार्यवाही करणे जेथवर स्पष्टपणे अभिप्रेत असेल किंवा तशी अनुज्ञा असेल त्या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करणार नाही.

(२) केंद्र सरकार, त्यास योग्य वाटल्यास कोणत्याही वेळी आणि अशा परिस्थितीमध्ये असा निदेश देऊ शकेल की, समादेशक अधिकारी किंवा, यथास्थिति, समिती त्यांनी कोणत्याही मयत व्यक्तीची संपदा, तिची व्यवस्था पाहण्यासाठी राज्याच्या महाप्रशासकाकडे सुपूर्द करावी आणि त्यानंतर तो समादेशक अधिकारी किंवा, यथास्थिति, समिती अशी संपदा अशा महाप्रशासकाकडे सोपवील.

(३) जेव्हा या कलमाखाली कोणतीही संपदा महाप्रशासकाकडे सोपविण्यात येईल तेव्हा, महाप्रशासक, [१][महाप्रशासक अधिनियम, १९६३ (१९६३ चा ४५)] याच्या तरतुदींनुसार किंवा ज्या राज्यामध्ये तो अधिनियम लागू करण्यात आला नसेल त्या राज्यात अंमलात असलेल्या तत्सम विधिच्या तरतुदींनुसार, अशा संपदेची व्यवस्था पाहील :

---

१. २००० चा अधिनियम ३१ याच्या कलम २ द्वारे दाखल केला (२५ ऑगस्ट, २००० रोजी व तेव्हापासून).

परंतु, मयत व्यक्तीच्या रेजिमेंटची व शिबिर किंवा क्वार्टर्सबाबतची अन्य काही देणी असतील तर, अशी देणी महाप्रशासक अशा मयत व्यक्तीकडून देय असलेल्या इतर कोणत्याही देय रकमेआधी प्राथम्यक्रमाने अदा करील.

(४) महाप्रशासक, सर्व देणी व आकार चुकते केल्यानंतर त्याच्याकडे जर काही अधिक रक्कम शिल्लक राहिली असेल तर, ती रक्कम, मयत व्यक्तीच्या वारसांकडे सुपूर्द करील आणि जर त्यास कोणत्याही वारसाचा पत्ता उपलब्ध झाला नाही तर, ती रक्कम विहित करण्यात आलेल्या व्यक्तीकडे विहित पद्धतीने सुपूर्द करील.

(५) महाप्रशासक, ह्या कलमांखालील आपल्या कर्तव्यांच्या बाबतीत, रेजिमेंटची व शिबिर किंवा क्वार्टर्सबाबतची अन्य काही देणी चुकती केल्यानंतर त्यांच्याकडे येणाऱ्या किंवा त्यांच्याकडे शिल्लक राहणाऱ्या एकूण रकमेवर तीन टक्क्यांपेक्षा अधिक फी आकारणार नाही.

**विहित व्यक्तींनी अधिक रकमेची विल्हेवाट लावणे.**

**८.** कलम ३ चे पोटकलम (७) किंवा कलम ४ चा खंड (दोन) किंवा कलम ७ चे पोटकलम (४) मध्ये उल्लेखिलेली शिल्लक रक्कम प्राप्त झाल्यानंतर, विहित व्यक्ती,—

(क) जर ती मयत व्यक्तीच्या एखाद्या प्रतिनिधीस ओळखत असेल तर त्या प्रतिनिधीला शिल्लक रक्कम अदा करील ;

(ख) जर ती मयत व्यक्तीच्या अशा कोणत्याही प्रतिनिधीस ओळखत नसेल आणि कलम १० खाली, अशा शिल्लक रकमेची विल्हेवाट लावण्यात आलेली नसेल तर, सलग सहा वर्षांपर्यंत दरवर्षी विहित नमुन्यात आणि पद्धतीने नोटीस प्रसिद्ध करील आणि अशा नोटीसांपैकी शेवटची नोटीस देखील प्रसिद्ध केल्यापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, मयत व्यक्तीच्या कोणत्याही प्रतिनिधीकडून शिल्लक रकमेसाठी मागणी केली गेली नाही तर, विहित व्यक्ती ती शिल्लक रक्कम, त्यावरील कोणतेही उत्पन्न किंवा उत्पन्नाची संचित रक्कम यांसह केंद्र सरकारच्या नावे जमा करील :

परंतु, अशी शिल्लक रक्कम जमा करण्यात आल्याने, कोणतीही व्यक्ती, जर ती अन्यथा त्यासाठी हक्कदार असेल तर, अशा शिल्लक रकमेच्या किंवा तिच्या कोणत्याही भागासाठी हक्कदार असण्यास बाध येणार नाही.

**चीजवस्तूची विल्हेवाट लावणे, परंतु पैशाची नाही.**

**९.** जेव्हा एखाद्या मयत व्यक्तीच्या संपदेचा कोणताही भाग म्हणून चीजवस्तू, कर्जरोखे किंवा पैशात रूपांतरित न केलेली इतर संपत्ती यांचा समावेश असतो तेव्हा कलम (३) चे पोटकलम (७), कलम ४ चा खंड (दोन) आणि कलम ८, यांच्या तरतुदी, शिल्लक रकमेच्या प्रदानासंबंधात, विहित करण्यात येईल त्या व्यतिरिक्त एरव्ही अशा चीजवस्तू, कर्जरोखे किंवा संपत्ती यांची सुपूर्दगी, पारेषण किंवा हस्तांतरण यास लागू असतील, आणि विहित व्यक्तीस, त्यांचे पैशामध्ये रुपांतर करण्याबाबत मयत व्यक्तीच्या प्रतिनिधीस जो अधिकार असेल, तोच अधिकार असेल.

**मृत्युपत्रप्रमाण, इत्यादी सादर न करता विवक्षित संपत्तीची विल्हेवाट लावणे.**

**१०.** एखाद्या मयत व्यक्तीच्या प्रतिनिधीस कलम ३, कलम ४ किंवा कलम ८ खाली, सुपूर्द करण्यायोग्य संपत्ती आणि प्रदेय रक्कम, जर अशी एकूण रक्कम किंवा अशा संपत्तीचे एकूण मूल्य रुपये [१][दोन लाखापेक्षा] अधिक होत नसेल तर आणि विहित व्यक्तीस तसे करणे योग्य वाटत असेल तर, त्याच्या मते ती रक्कम मिळण्यास किंवा मयत व्यक्तीच्या संपदेचे प्रशासन करण्यास जी व्यक्ती हक्कदार असल्याचे वाटत असेल, अशा व्यक्तीस कोणतेही मृत्युपत्रप्रमाण, प्रबंधपत्र, उत्तराधिकार प्रमाणपत्र किंवा हक्काबाबतचा निर्णायक अन्य पुरावा सादर करण्याची अपेक्षा न करता, सुपूर्द किंवा प्रदान करता येईल.

**समादेशक अधिकारी, समिती किंवा विहित व्यक्ती व केंद्र सरकार यांची कार्यमुक्ती.**

**११.** कलमे ३, ४, ८, ९ किंवा १० अनुसार समादेश अधिकारी, समिती किंवा विहित व्यक्ती यांनी सद्‌भावपूर्वक केलेले किंवा करण्याचे अभिप्रेत असलेले कोणत्याही रकमेचे प्रदान किंवा उपयोजन किंवा कोणत्याही संपत्तीचे उपयोजन, सुपूर्दगी, विक्री किंवा अन्य विन्यास विधिग्राह्य असेल आणि समादेशक अधिकारी, समिती किंवा, यथास्थिति, विहित व्यक्ती यांना आणि केंद्र सरकारला, त्या रकमेच्या किंवा संपत्तीच्या संबंधातील सर्व अतिरिक्त दायित्वामधून संपूर्णतः मुक्त करील, परंतु यातील कोणत्याही गोष्टीमुळे मृत्युपत्र व्यवस्थापकाच्या किंवा प्रशासकाच्या किंवा अन्य प्रतिनिधीच्या किंवा मृत व्यक्तीच्या कोणत्याही धनकोच्या, ज्याला असे प्रदान किंवा सुपूर्दगी करण्यात आलेली आहे अशा कोणत्याही व्यक्तीविरूद्ध असलेल्या हक्काला बाधा येणार नाही.

---

१. २००० चा अधिनियम ३१, कलम ३ द्वारे दाखल केले (२५ ऑगस्ट, २००० रोजी व तेव्हापासून).

**समादेशक अधिकारी, समिती किंवा विहित व्यक्ती जेथे स्थित आहेत तेथे समादेशक अधिकारी, समिती किंवा विहित व्यक्ती यांच्या अखत्यारित असलेली संपत्ती.**

१२. कलम ३, कलम ४ किंवा कलम ७ च्या पोटकलम (४) खाली समादेशक अधिकारी समिती किंवा विहित व्यक्ती यांच्या अखत्यारीत येणारी कोणतीही संपत्ती ही, तो समादेशक अधिकारी, समिती किंवा विहित व्यक्ती तेथे स्थित आहे या कारणावरून, त्या ठिकाणची संपदा किंवा चीजवस्तू असल्याचे समजले जाणार नाही, आणि त्या कारणास्तव, त्या संपत्तीसंबंधात त्या स्थानासाठी त्याचे प्रतिनिधित्व काढून घेणेही आवश्यक ठरणार नाही.

**प्रतिनिधीच्या हक्काची व्यावृत्ती.**

१३. कलम ३, पोटकलम (७) किंवा कलम ४ चा खंड (दोन) या खाली समादेशक अधिकाऱ्याने किंवा समितीने, विहित व्यक्तीला कोणत्याही मयत व्यक्तीच्या संपत्तीतील अतिरिक्त संपत्ती प्रदान केल्यानंतर मयत व्यक्तीच्या कोणत्याही प्रतिनिधीस किंवा कोणत्याही महाप्रबंधकास, समादेशक अधिकाऱ्याद्वारे, किंवा, यथास्थिति, समितीद्वारे (ताब्यात घेण्यात) आली नसेल अशा आणि पूर्वोक्त अतिरिक्त संपत्तीचा भाग नसेल अशा, मयत व्यक्तीच्या संपत्तीच्या संबंधात, जणू काही कलम ३ व ४ अधिनियमित करण्यात आले नसल्याप्रमाणे हक्क व कर्तव्ये असतील.

**विकलमनाच्या व्यक्तीला किंवा सक्रिय सेवेत असताना बेपत्ता व्यक्ती म्हणून कळवण्यात आलेल्या व्यक्तींना कलमे ३ ते १३ लागू असणे.**

१४. सेना अधिनियम, १९५० किंवा, यथास्थिति, वायुसेना अधिनियम, १९५० याच्या अधीन जी व्यक्ती, [१][मानसिक स्वास्थ्य अधिनियम, १९८७ (१९८७ चा १४)] मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी विकल मनाची व्यक्ती असल्याबाबत विहित रीतीने निश्चित करण्यात आलेले असेल किंवा जी व्यक्ती, सेवेत कार्यरत असताना बेपत्ता असल्याचे अधिकृतपणे कळवण्यात आलेले असेल, अशा व्यक्तीबाबतही ती व्यक्ती ज्या दिवशी विकल मनाची असण्याबाबत निश्चिती करण्यात येईल किंवा, यथास्थिति, ज्या दिवशी ती व्यक्ती बेपत्ता झाली असल्याचे अधिकृतपणे कळवण्यात येईल, त्या दिवशी ती व्यक्ती मयत झाल्याचे समजून कलम ३ ते १३ पर्यंतच्या तरतुदी जेथवर लागू करता येतील तेथवर लागू होतील :

परंतु असे की, अशा बेपत्ता म्हणून कळवण्यात आलेल्या व्यक्तीच्या संबंधात कलम ३ ची पोटकलमे (२) ते (६) किंवा कलम ४ किंवा कलम ७ या अन्वये ती मृत झाल्याबाबत जोपर्यंत अधिकृतपणे खात्री करण्यात येणार नाही तोपर्यंत, कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.

**विवक्षित प्रकरणात समायोजन स्थायी समिती नियुक्त करणे.**

१५. जेव्हा एखादा अधिकारी मरण पावतो किंवा सेवेतून पळून जातो किंवा विकल मनाचा झाला असल्याची विहित रीतीने खात्री करण्यात येते, किंवा सेवेत कार्यरत असताना बेपत्ता झाल्याचे अधिकृतपणे कळवण्यात येते तेव्हा या अधिनियमाच्या पूर्वगामी तरतुदींमध्ये समितीच्या संबंधात केलेला निर्देश, या संदर्भात विहित रीतीने नियुक्त करण्यात आलेली समायोजन स्थायी समिती, कोणतीही असल्यास, त्या समितीबाबत केलेला निर्देश समजण्यात येईल आणि या अधिनियमाखालील स्थायी समितीची सर्व कार्ये पार पाडण्यास केवळ अशीच स्थायी समिती हक्कदार असेल.

**नियम करण्याचा अधिकार.**

१६. (१) केंद्र सरकारला, या अधिनियमाची प्रयोजने अंमलात आणण्याच्या प्रयोजनासाठी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषतः व पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, अशा नियमांद्वारे पुढील गोष्टींसाठी तरतूद करता येईल,—

(क) एखाद्या मयत किंवा सेवेतून पळून गेलेल्या व्यक्तीची कोणतीही संपत्ती कोणत्याही रीतीने प्राप्त करता येईल किंवा गोळा करता येईल आणि त्याच्या रेजिमेंटची व शिबिर किंवा क्वार्टर्समधील इतर देणी अदा करता येतील ती रीत विहित करणे ;

(ख) कोणत्याही मयत व्यक्तीच्या अंत्यसंस्काराच्या खर्चाचे प्रदान करण्यासाठी तरतूद करणे ;

(ग) या अधिनियमान्वये समायोजन समिती किंवा समायोजन स्थायी समिती घटित करण्याची तरतूद करणे ;

(घ) या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी कोणत्या व्यक्तीस विहित व्यक्ती समजण्यात येईल, ते विनिर्दिष्ट करणे ;

(ङ) कोणत्याही मयत व्यक्तीची संपदा कोणत्या परिस्थितीमध्ये महाप्रशासकाकडे सुपूर्द करण्यात येईल ती परिस्थिती विहित करणे ;

---

१. २००० चा अधिनियम ३१, कलम ४ द्वारे दाखल केले (२५ ऑगस्ट, २००० रोजी व तेव्हापासून).

(च) कलम ८ खालील नोटीस ज्या नमुन्यात व ज्या रीतीने प्रसिद्ध करण्यात येईल, तो नमुना व रीत विहित करणे ;

(छ) कोणत्याही व्यक्तीस विकल मनाची असल्याचे ज्या पद्धतीने ठरविण्यात येईल, त्याबाबतची कार्यपद्धती विहित करणे.

[१][(३) केंद्र सरकारने या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्राच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल, किंवा, यथास्थिति, मुळीच परिणामक होणार नाही, तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, त्या नियमाखाली तत्पूर्वी करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.]

**१७.** * * * * * * *

---

१. १९८३ चा अधिनियम २०, कलम २ व अनुसूचीयाद्वारे पोटकलम (३) समाविष्ट करण्यात आले (१५ मार्च, १९८४ रोजी व तेव्हापासून).

# THE ARMY AND AIR FORCE (DISPOSAL OF PRIVATE PROPERTY) ACT, 1950

## सेना आणि वायुसेना (खाजगी संपत्तीची विल्हेवाट) अधिनियम, १९५०

इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| adjustment | समायोजन | [sec. 2 (1)] |
| administrator | प्रशासक | [sec. 4] |
| administrator General | महाप्रशासक | [sec. 4] |
| agent | अभिकर्ता | [sec. 3 (2)(b)] |
| application | उपयोजन | [sec. 11] |
| camp | शिबिर | [sec. 5] |
| commanding Officer | समादेशक अधिकारी | [sec. 3 (2)] |
| creditor | धनको | [sec. 11] |
| delivery | सुपूर्दगी | [sec. 9] |
| desert | सेवेतून पळून जाणे | [preamble] |
| disposal | विल्हेवाट | [sec. 3 (7)(b)] |
| disposition | विन्यास | [sec. 11] |
| effects | चीजवस्तू | [sec. 9] |
| estate | संपदा | [sec. 4] |
| forfeited | समपहृत | [sec. 3 (7)(b)] |
| in the hands of | अखत्यारीत | [sec. 12] |
| inventory | वस्तूसूची | [sec. 3 (1)(a)] |
| latter of administration | प्रबंधपत्र | [sec. 4] |
| movable property | जंगम संपत्ती | [sec. 3 (1)(a)] |
| probate | मृत्युप्रमाणपत्र | [sec. 4] |
| property | संपत्ती | [sec. 9] |
| securities | कर्जरोखे | [sec. 9] |
| surrender | समर्पित | [sec. 3 (7)(b)] |
| to pay | अदा करणे | [sec. 4 (II)] |
| transfer | हस्तांतरण | [sec. 9] |
| transmission | पारेषण | [sec. 9] |
| unsound mind | विकल मन | [preamble] |

# सेना आणि वायुसेना (खाजगी संपत्तीची विल्हेवाट) अधिनियम, १९५०

# THE ARMY AND AIR FORCE (DISPOSAL OF PRIVATE PROPERTY) ACT, 1950

मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अखत्यारीत | in the hands of | [कलम १२] |
| अदा करणे | to pay | [कलम ४ (दोन)] |
| अभिकर्ता | agent | [कलम ३ (२)(ख)] |
| उपयोजन | application | [कलम ११] |
| कर्जरोखे | securities | [कलम ९] |
| चीजवस्तू | effects | [कलम ९] |
| जंगम संपत्ती | movable property | [कलम ३ (१)(क)] |
| धनको | creditor | [कलम ११] |
| पारेषण | transmission | [कलम ९] |
| प्रबंधपत्र | latter of administration | [कलम ४] |
| प्रशासक | administrator | [कलम ४] |
| महाप्रशासक | administrator General | [कलम ४] |
| मृत्युप्रमाणपत्र | probate | [कलम ४] |
| वस्तूसूची | inventory | [कलम ३ (१)(क)] |
| विकल मन | unsound mind | [उद्देशिका] |
| विन्यास | disposition | [कलम ११] |
| विल्हेवाट | disposal | [कलम ३ (७)(ख)] |
| शिबिर | camp | [कलम ५] |
| समपहृत | forfeited | [कलम ३ (७)(ख)] |
| समर्पित | surrender | [कलम ३ (७)(ख)] |
| समादेशक अधिकारी | commanding officer | [कलम ३ (२)] |
| समायोजन | adjustment | [कलम २ (१)] |
| सेवेतून पळून जाणे | besert | [उद्देशिका] |
| सुपूर्दगी | delivery | [कलम ९] |
| संपत्ती | property | [कलम ९] |
| संपदा | estate | [कलम ४] |
| हस्तांतरण | transfer | [कलम ९] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई